# छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७

## योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करावयाची पध्दत व तदनुषंगिक सूचना

### १) प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ जाहिर करण्यात आलेली असून ही योजना राज्य आधार अधिनियम, २०१७ अंतर्गत अधिसूचित करण्यात येत आहे. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी करावयाचा अर्ज आधार प्रमाणीकरणाच्या आधारे सॉफ्टवेअर ॲप्लीकेशनचा उपयोग करुन ऑनलाईन सादर करावयाचा आहे.

### २) ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत

**(अ) अर्जदाराची नोंदणी व अर्जदाराने स्वत: अर्जाचे डिजीटायझेशन करण्याची पध्दत पुढीलप्रमाणे**

(१) https://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर योजनेची लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(२) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ बाबत लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्जासाठी नविन टॅबवर http://www.csmssy.in हे पोर्टल उघडेल.

(३) या पोर्टलवर अर्जदारास नोंदणी करण्याच्या कार्यवाहीची निश्‍चित पध्दत, शासन निर्णय व योजनेचा इतर तपशील उपलब्ध होईल.

(४) अर्जदाराने त्याची स्वत:ची व त्याच्या कुटूंबातील (कुटुंब म्हणजे अर्जदार, पती / पत्नी व १८ वर्षाखालील अपत्ये) प्रत्येक सदस्याची **आधार क्रमांक / आधार क्रमांक नसल्यास नव्याने आधार क्रमांकासाठी नोंदणी करुन मिळणारा EID** आधारीत किंवा आधार क्रमांकाशिवाय नोंदणी करण्यासाठी अर्जदाराने "न्यू रजिस्ट्रेशन " यावर क्लिक करावे.

(५) "नविन नोंदणी" यावर क्लिक केल्यावर अर्जदारास आधार क्रमांक आहे काय अशी विचारणा होईल. "होय" या पर्यायाची निवड केल्यास "OTP" व "Biometric" असे दोन पर्याय दिसतील.

(६) "OTP" आधारीत प्रमाणीकरण करावयाचे असल्यास त्यासाठी 'एक वेळ पासवर्ड'आधार क्रमांकाशी नोंदणीकृत/जोडलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठविला जाईल. मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाला जोडला असेल तर या पर्यायाची निवड करावी. जर अर्जदाराचा मोबाईल क्रमांक आधार कमांकाशी जोडलेला नसेल तर त्यांने/तिने नजिकच्या आधार नोंदणी केंद्रावर जाऊन आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी जोडून घ्यावा.

(७) जर अर्जदार अथवा कुटूंबातील इच्छूक सदस्याकडे आधार क्रमांक नसल्यास वेब पोर्टल वरील आधार विरहीत नोंदणीचा पर्याय मार्फत ते नोंदणी करु शकतात. तथापी अर्जदाराने याची नोदं घ्यावी की त्यास आधार क्रमांक मिळताच, या योजनेचा फायदा घेण्यासाठी त्याने आधार क्रमांक वेब पोर्टलवर अदयावत करणे आवश्यक आहे.

(८) वरील पैकी एखादया पध्दतीने नोंदणी यशस्वी झाल्यावर, अर्जदार आणि त्याच्या कुटूंबातील सदस्य उपलब्धतेनुसार वैयक्तीक युजर आयडी व योग्य पासवर्ड निवडू शकतील.

(९) अर्जदाराने त्याच्या/तिच्या युजर आयडी (user id) व पासवर्ड (password) द्वारे http://www.csmssy.in या पोर्टलवर लॉगीन (Login) करावयाचे आहे.

(१०) अर्जदाराने अर्जाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असलेली 'कर्जमाफी योजना' लिंक याची निवड केल्यास कर्जमाफी अर्जाचा नमूना संगणकावर दिसेल.

(११) अर्जदाराने जर आधार क्रमांकाव्दारे नोंदणी केली असेल तर कर्जमाफी अर्जात अर्जदाराबाबतची मूलभूत माहिती उदा. नाव, आधार क्रमांक, लिंग, मोबाईल क्रमांक, जन्म तारीख, पत्ता इत्यादी माहिती आधार क्रमांकाच्या डेटाबेस मधून आपोआप उपलब्ध होईल.

(१२) अर्जदाराने त्यानंतर अर्जामध्ये पॅन कार्डाचा तपशील, पेन्शन पीपीओचा तपशील, कर्जाचा तपशील इत्यादी भरला पाहिजे. अर्जामध्ये कुंटूबातील ( अर्जदार, पती / पत्नी व १८ वर्षाखालील अपत्ये ) प्रत्येक व्यक्तीस एकापेक्षा अधिक कर्जाची माहिती भरण्याचा पर्याय देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(१३) अर्जदाराने त्याच्या छापील अर्जात भरलेल्या माहितीच्या आधारे त्याची, पती / पत्नी व १८ वर्षाखालील कर्जदार अपत्यांची माहिती देखील ऑनलाईन पोर्टलवर भरली पाहिजे.

(१४) अर्जदाराने ऑनलाईन अर्ज सादर केल्यावर संगणक प्रणालीव्दारे अर्जाची पोच पावती दिसेल. अर्जदार त्याच्या भावी उपयोगाकरीता या पावतीची मुद्रीत प्रत घेऊ शकेल किंवा पीडीएफ वर जतन करुन ठेवू शकेल.

(१५) अर्जदाराने भविष्यातील संदर्भासाठी त्याचे युझर नेम व पासवर्ड स्वत:च्या स्मरणात ठेवले पाहिजेत असे सुचविण्यात येते.

**ब) <u>सीएससी (CSC) केंद्रावर अर्जाची नोंदणी व संगणकीकरणाची पर्यायी पध्दत</u>**

(१) अर्जदाराने भरलेल्या अर्जासह जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रास भेट दयावी. जवळच्या आपले सरकार सेवा केंद्राची यादी http://www.csmssy.in या पोर्टलवरुन उपलब्ध करुन घेता येईल.

(२) या योजनेच्या पोर्टलची लिंक **https://aaplesarkar.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्जासाठी नविन टॅबवर http://www.csmssy.in हे पोर्टल उघडेल.

(४) अर्जदाराने त्याची स्वत:ची व त्याच्या कुटूंबातील प्रत्येक सदस्याची (अर्जदार, पती / पत्नी व १८ वर्षाखालील कर्जदार अपत्यांचीच) आधार क्रमांक आधारीत किंवा आधार क्रमांकाशिवाय नोंदणी करण्यासाठी अर्जदाराने "न्यू रजिस्ट्रेशन " यावर क्लिक केले पाहिजे.

(५) "नविन नोंदणी" यावर क्लिक केल्यावर अर्जदारास आधार क्रमांक आहे काय अशी विचारणा होईल. ' होय ' या पर्यायाची निवड केल्यास "OTP" व "Biometric" असे दोन पर्याय दिसतील

(६) "OTP" (एक वेळ पासवर्ड) आधारीत प्रमाणीकरण करण्यासाठी एक वेळ पासवर्ड आधार क्रमांकाशी नोंदणीकृत/जोडलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठविला जाईल. मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाला जोडला असेल तर या पर्यायाची निवड करावी. जर अर्जदाराचा मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाशी जोडलेला नसेल तर त्यांने/तिने नजिकच्या आधार नोंदणी केंद्रावर जाऊन असा आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी जोडून घ्यावा.

(७) बायोमेट्रीक आधारित प्रमाणीकरणासाठी संगणक यंत्रणेला जोडलेले बायोमेट्रीक उपकरण कार्यरत असल्याची नोंदणी पूर्वी खात्री करुन घ्यावी.

(८) जर अर्जदार अथवा त्याच्या कुटूंबातील कर्जदार सदस्याकडे आधार क्रमांक नसल्यास वेब पोर्टलवरील आधार विरहीत नोंदणीचा पर्याया निवडून ते नोंदणी करु शकतात. तथापी अर्जदाराने याची नोंद घ्यावी की त्यास आधार क्रमांक मिळताच, या योजनेचा फायदा घेण्यासाठी त्याने आधार क्रमांक वेब पोर्टलवर अदयावत करणे आवश्यक राहील.

(९) वरील पैकी एखादया पध्दतीने नोंदणी यशस्वी झाल्यास, अर्जदार व त्याच्या कुटूंबातील सदस्य उपलब्धतेनुसार वैयक्तीक युजर आयडी व योग्य पासवर्ड निवडू शकतील.

(१०) सेवा केंद्राच्या ऑपरेटरने अर्जदाराच्या युजर आयडी व पासवर्ड मधून http://www.csmssy.in या लिंकवर लॉगीन केले पाहिजे.

(११) लॉगीन केल्यावर सेवा केंद्राच्या ऑपरेटरने ॲप्लीकेशन लॉगीन मध्ये कर्जमाफी योजना ही लिंक निवडावी म्हणजे त्यास कर्जमाफीचा अर्ज माहिती भरण्यासाठी संगणकावर दिसू लागेल.

(१२) अर्जदाराने जर आधार क्रमांकाव्दारे नोंदणी केली असेल तर कर्जमाफी अर्जात अर्जदाराबाबतची मूलभूत माहिती उदा. नाव, आधार क्रमांक, लिंग, मोबाईल क्रमांक, जन्म तारीख, पत्ता इत्यादी माहिती आधार क्रमांकाच्या डेटाबेसमधून आपोआप उपलब्ध होईल.

(१३) सेवा केंद्राच्या ऑपरेटरने नंतर अर्जामध्ये पॅन कार्डाचा तपशील, पेन्शन पीपीओचा तपशील, कर्जाचा तपशील इत्यादी भरला पाहिजे. अर्जामध्ये कुंटूबातील प्रत्येक (अर्जदार, पती / पत्नी व १८ वर्षाखालील कर्जदार अपत्ये) व्यक्तीस एकापेक्षा अधिक कर्जाची माहिती भरण्याचा पर्याय देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(१४) सेवा केंद्राच्या ऑपरेटरने पोर्टलवर उपलब्ध असलेल्या अर्जाच्या सर्व स्तंभातील माहिती भरताना अर्जदाराच्या छापील अर्जातील माहितीचा वापर करावा.

(१५) सेवा केंद्राच्या ऑपरेटरने पोर्टलवर उपलब्ध असलेल्या अर्जातील पती/पत्नी आणि इतर कुंटूबातील सदस्यांची माहिती भरताना छापील अर्जातील माहितीचा वापर करावा.

(१६) सेवा केंद्राच्या ऑपरेटरने ऑनलाईन अर्ज सादर केल्यावर संगणक प्रणालीव्दारे अर्जाची पोच पावती संगणकावर दिसेल. सेवा केंद्राच्या ऑपरेटरने अर्जदाराच्या भावी उपयोगाकरीता या पावतीची मुद्रीत प्रत घ्यावी आणि ती अर्जदारास दयावी.

(१७)भविष्यातील संदर्भासाठी अर्जदाराचे युझर नेम व पासवर्ड स्वत:च्या स्मरणात ठेवले पाहिजेत असे सेवा केंद्राच्या ऑपरेटरने अर्जदारास सुचवावे.

**३) नमुन्यातील अर्जाचे वर्णन :-**

(१) अर्जदारास ऑनलाईन अर्ज भरण्यास सुविधा व्हावी म्हणून छापील अर्ज खालील ठिकाणी उपलब्ध असतील.

- प्रमुख वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील अर्जाचा नमुना.
- http://www.csmssy.in या संकेतस्थळावरुन दि. २४.०७.२०१७ पासून अर्ज उतरवून घेता येईल.
- दि. २४.०७.२०१७ पासून खालील ठिकाणांवरुन अर्जाच्या छायांकित प्रती काढून घेता येतील.
    a. जिल्हाधिकारी
    b. तहसिलदार
    c. जिल्हा उपनिबंधक/उपनिबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
    d. ग्राम पंचायत
    e. बँका व प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्था/विविध कार्यकारी सहकारी संस्था
    f. आपले सरकार सेवा केंद्र

(२) अर्जास दोन बाजू असून पहिल्या बाजूवर अर्जदाराची मूलभूत माहिती भरावयाची आहे. जसे कि, नाव, पत्ता, आधार क्रमांक/EID, लिंग, जन्म दिनांक, मोबाईल क्रमांक. या योजनेचा लाभ घेण्यासाठी १ ते ६ रकान्यातील माहिती भरणे बंधनकारक आहे.

**<u>पहिली बाजू</u>**



महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना - वर्ष २०१७

कर्जमाफी / प्रोत्साहनपर इतर लाभ मिळण्यासाठी करावयाचा अर्ज तथा घोषणापत्र

आपले सरकार

दिनांक:   /   /                                        अर्ज क्रमांक:

| (अ) | अर्जदारांचा तपशील | अर्जदार # | पत्नी/पती # | अपत्य -१ (१८ वर्षाखालील) # | अपत्य-२ (१८ वर्षाखालील) # |
|---|---|---|---|---|---|
| I | **वैयक्तिक माहिती** | | | | |
| १ | संपूर्ण नांव (स्वत:चे, वडीलांचे/पतीचे, आडनांव) | | | | |
| २ | आधार क्रमांक/EID* | | | | |
| ३ | पत्ता | | | | |
| ४ | लिंग (स्त्री/पुरुष) | | | | |
| ५ | जन्मतारीख (दिनांक/महिना/वर्ष) | | | | |
| ६ | मोबाईल क्रमांक | | | | |
| ७ | पॅन क्रमांक (१० अंकी) (असल्यास) | | | | |
| ८ | पेन्शन पीपीओ क्रमांक (असल्यास) | | | | |
| II | **पीक/मध्यम मुदत कर्जाचा तपशील** | | | | |
| i) | **कर्ज खाते क्रमांक १** | | | | |
| | बँकेचे/वि.का.स. संस्थेचे नांव | | | | |
| | बँक शाखा | | | | |
| | बचत खाते क्रमांक | | | | |
| ii) | **कर्ज खाते क्रमांक २** | | | | |
| | बँकेचे/वि.का.स. संस्थेचे नांव | | | | |
| | बँक शाखा | | | | |
| | बचत खाते क्रमांक | | | | |
| iii) | **कर्ज खाते क्रमांक ३** | | | | |
| | बँकेचे/वि.का.स. संस्थेचे नांव | | | | |
| | बँक शाखा | | | | |
| | बचत खाते क्रमांक | | | | |

*टीप: १) सदर योजनेअंतर्गत आधार क्रमांक नमूद करावा. तो उपलब्ध नसल्यास आधार क्रमांक मिळविण्यासाठी नोंदणी करुन त्याबाबतचा नोंदणी क्रमांक (EID) वरील तक्यात रकाना क्र.२ मध्ये नमूद करावा.

# अर्जदार व पती/पत्नीची माहिती देणे बंधनकारक आहे. अपत्य कर्जदार असेल तरच या रकान्यात माहिती भरावी.

(३) अनुक्रमांक ७ व ८ रकान्यामधील माहिती लागू असल्यास अर्जदाराने भरावी.

(४) अर्जदाराने कुटूंबातील (कुटूंब म्हणजे अर्जदार स्वत:, पती / पत्नी व १८ वर्षाखालील अपत्ये) सर्व कर्जदारांच्या माहितीचा तपशील एकाच अर्जात भरला पाहिजे.

(५) अर्जाच्या पहिल्या बाजूचा दुसरा विभाग अर्जदाराच्या कर्जाबाबतच्या तपशीलाविषयी आहे. कर्ज खाते क्रमांक व त्या कर्ज खातेदाराशी निगडीत असलेल्या बचत खात्याचा क्रमांक नमूद केला असल्याची अर्जदाराने खात्री केली पाहिजे.

(६) अर्जदाराकडे जर आधार क्रमांक असेल, तर अर्जदाराने त्याच्या स्वत:चा, पती / पत्नीचा आधार क्रमांक नमूद करावा. अर्जदाराकडे जर आधार क्रमांक नसेल, तर अर्जदाराला त्याची ओळख पटविण्यासाठी ओळखीचा इतर पुरावा दयावा लागेल.

(७) अज्ञान / अवलंबीत अपत्याबाबतची माहिती, जर ते कर्जदार असतील तरच भरण्यात यावी.

(८) अर्जामध्ये अर्जदाराच्या कुटूंबामधील फक्त तीन कर्जाची माहिती व दोन १८ वर्षाखालील कर्जदार अपत्यांची माहिती भरण्यासाठी जागा उपलब्ध आहे. जर अर्जदारास त्याच्या कुटूंबामध्ये तीन पेक्षा जास्त कर्जाची माहिती/ दोनपेक्षा जास्त १८ वर्षाखालील कर्जदार अपत्यांची माहिती भरावयाची असल्यास त्याने अशी माहिती भरण्यासाठी अतिरिक्त नमुना पृष्ठ / अर्जामध्ये माहिती भरुन मूळ अर्जासोबत जोडावे.

(९) सर्व अर्जदारांनी (योजनेचा फायदा घेवू इच्छिणा-या) याची नोंद घ्यावी की, त्यांनी त्यांचा आधार क्रमांक देणे व तो ऑनलाईन पोर्टलवर पुढील काळात अदयावत करणे आवश्यक आहे.

## दुसरी बाजू

| (ब) | **घोषणापत्र**<br>शासन निर्णय दिनांक २८ जून, २०१७ मधील नमुद परिच्छेद (III) मधील खालील (i) ते (viii) पैकी कोणतीही अपात्रता मी धारण करीत नाही. |
|---|---|
| i | महाराष्ट्र राज्यातील आजी/माजी मंत्री/राज्यमंत्री, आजी/माजी खासदार/राज्यसभा सदस्य, आजी/माजी विधानसभा/विधानपरिषद सदस्य |
| ii | जिल्हा परिषद सदस्य, महानगरपालिका यांचे सदस्य |
| iii | केंद्र व राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी, निमशासकीय संस्थांचे सर्व अधिकारी/कर्मचारी व केंद्र अथवा राज्य शासन अनुदानित संस्थांचे सर्व अधिकारी/कर्मचारी (चतुर्थ श्रेणी कर्मचारी वगळून) |
| iv | शेती बाह्य उत्पन्नातून आयकर भरणाऱ्या व्यक्ती |
| v | निवृतीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे मासिक निवृतीवेतन रुपये पंधरा हजारापेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून) |
| vi | कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकारी साखर कारखाना, सहकारी सूत गिरणी, नागरी सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सहकारी दूध संघ यांचे अधिकारी व पदाधिकारी (अध्यक्ष व उपाध्यक्ष) आणि मजूर सहकारी संस्थांचे अध्यक्ष |
| vii | रुपये ३.00 लाखापेक्षा जास्त ढोबळ उत्पन्न असेलेली सेवा कर भरण्यासाठी नोंदणीकृत व्यक्ती |
| viii | जी व्यक्ती मुल्यवर्धित कर वा सेवा कर कायद्यातंर्गत नोंदणीकृत आहे व ज्याची सन २०१६-१७ मधील वार्षिक उलाढाल रु. १0.00 लक्ष किंवा अधिक आहे. |

| (क) | **सदर योजनेनुसार मी कर्जमाफी/प्रोत्साहनपर इतर लाभास पात्र असल्यामुळे मला पुढीलप्रमाणे अनुज्ञेय लाभ मंजूर करण्यात यावेत.**<br>**खालील अनुक्रमांक (१) ते (४) पैकी जे लागू असेल त्यापुढे ✓ अशी खूण करावी.** | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेतील लाभाचा तपशिल** | |
| १ | कुटूंबाच्या सर्व सदस्यांची मिळून रु. १.५0 लाख पेक्षा कमी असणारी मुद्दल व व्याजासह थकीत रक्कमेच्या माफीस पात्र | ☐ |
| २ | कुटूंबाच्या सर्व सदस्यांची मिळून रु. १.५0 लाखापेक्षा जादा असणारी मुद्दल व व्याजासह थकीत रक्कमेपैकी रु. १.५0 लाखापेक्षा जास्त असणारी माझ्या हिश्याची रक्कम भरण्याच्या अटीस अधिन राहून रु. १.५0 लाख रक्कमेची माफी मिळणेस पात्र | ☐ |
| ३ | सन २०१५-१६ आणि सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मधील पीक कर्जाची विहीत मुदतीत परतफेड केल्यापोटी अनुज्ञेय प्रोत्साहन लाभास पात्र | ☐ |
| ४ | सन २०१५-१६ पर्यंतच्या पुनर्गठित केलेल्या पीक कर्जासाठी अनुज्ञेय लाभ मिळण्यास पात्र | ☐ |

**मी या अर्जात दिलेली अ, ब व क मधील वरील सर्व माहिती माझ्या माहिती व समजुतीनुसार पूर्णतः सत्य असून सदर माहिती खोटी किंवा दिशाभूल करणारी असल्याचे शासनाचे निदर्शनास आल्यास मला प्राप्त झालेली कर्ज माफीची / प्रोत्साहनपर इतर लाभाची रक्कम व्याज / दंडासह परतफेड करण्यास मी बांधील आहे. तसेच याबाबत होणाऱ्या फौजदारी व इतर कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. या अर्जात नमूद केलेली कर्जमाफी / प्रोत्साहनपर लाभ शासन धोरणाप्रमाणेच अनुज्ञेय असेल याची मला जाणीव आहे.**

**ठिकाण :**

**दिनांक :**

| संपर्काचा मोबाईल क्रमांक* (बंधनकारक) | अर्जदाराचे नाव | अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठा |
|---|---|---|
| | | |

**अर्ज भरण्यासंबधी सूचना**

१) अर्जदार व पती/पत्नी तसेच १८ वर्षाखालील कर्जदार अपत्यांचीच माहिती भरणे बंधनकारक आहे तसेच या सर्वांच्या आधार कार्डाचा क्रमांक किंवा तो नसल्यास आधार नोंदणी क्रमांक (EID) नमूद करावा.

२) अर्जदार पती/पत्नी व १८ वर्षाखालील अपत्ये यांनी कुटुबांसाठी एकच फॉर्म भरायचा आहे.

३) कुटुंबातील सदर सदस्यांनी घेतलेल्या पीक कर्ज / मध्यम मुदत कर्जाचा खाते क्रमांकाचा तपशील नमूद करावा. तपशील नमूद करत असताना जागा अपूरी असल्यास सोबत अर्जाचा नमुना अतिरिक्त जोडून त्यामध्ये सर्व माहिती भरावी. जे संयुक्त कर्जदार असतील त्यामधील प्रत्येकाने स्वतंत्ररित्या अर्ज सादर करावे.

४) अर्ज सादर करत असताना अर्जात भरलेल्या माहितीच्या पडताळणी साठी खालील कागदपत्रे सोबत आणावीत.
   i) आधार कार्ड/आधार नोंदणी क्रमांक (EID) केल्याबाबतची पोहच.
   ii) कर्ज खाते पुस्तिका/उतारा व बचत खाते पुस्तिका.
   iii) पॅनकार्ड (असल्यास)
   iv) आधारकार्ड/पॅनकार्ड/पेन्शन पीपीओ बुक/बँकेचे पासबुक यांची छायांकित प्रत/फाटो कॉपी

५) अर्जदाराने आपल्या गावातील/शहरातील अथवा जवळच्या गावातील आपले सरकार सेवा केंद्रात अर्ज सादर करावा. सदर अर्ज मिळाल्याबद्दल संपर्क मोबाईल वर एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल.

(१०) अर्जाची दुसरी बाजू अर्जदाराकडून त्याचे स्वत:चे व त्याच्या कुटूंबाच्या वतीने करावयाच्या विविध घोषणांबाबत आहे.

(११) अर्जावर अर्जदाराने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

(१२) ऑनलाईन माहिती भरण्यापूर्वी अर्जदाराने छापील नमुन्यातील अर्जात सर्व माहिती भरुन तो आवश्यक कागदोपत्री पुराव्यांसह तयार ठेवला पाहिजे. जर अर्जदार आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत संगणकावर माहिती भरण्याचा पर्याय निवडणार असेल तर त्याने भरलेला छापील अर्जाचा नमुना व कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

४) **आपले सरकार सेवा केंद्रावरील कार्यपध्दतीचे वर्णन :-**

(१) अर्जदाराने भरलेल्या अर्जासोबत आधार कार्ड / EID, पॅनकार्ड (असल्यास), बँक बचत खात्याचे पासबुक दि. २४.७.२०१७ नंतर नजिकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर सादर करावे.

* अर्ज स्विकारणा-या आपले सरकार केंद्राची यादी http://www.csmssy.in या संकेतस्थळावर दि. २४.७.२०१७ पासून उपलब्ध राहील.

(२) आपले सरकार सेवा केंद्र ऑपरेटर/निर्देशित प्राधिकरण हे भरलेला अर्ज व त्या पुष्ठयर्थ कागदपत्रे सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत स्विकारतील.

(३) आपले सरकार सेवा केंद्रावर असलेले ऑपरेटर/निर्देशित प्राधिकरण यांचेकडून अर्ज व त्यासोबत जोडलेल्या छायांकीत प्रतींची पडताळणी केली जाईल. सदर केंद्राचे ऑपरेटर/निर्देशित प्राधिकरण अर्जामधील खालील बाबींची पडताळणी करतील.

अ) अर्जदाराच्या अर्जामध्ये नमूद त्याचा स्वत:चा, पती/ पत्नीचा व कुटूंबातील कर्ज घेतलेल्या १८ वर्षाखालील अपत्यांचा आधार क्रमांक. जर अर्जदाराकडे आधार क्रमांक नसेल तर त्याची ओळख पटविणारा इतर पुरावा.

ब) सेवा केंद्राच्या ऑपरेटरने/निर्देशित प्राधिकरणाने अर्जामध्ये नमूद केलेला आधार क्रमांक व अर्जदाराने दिलेल्या आधार कार्डची मूळ प्रत/ छायांकीत प्रत यामध्ये दिलेला आधार क्रमांक एकच आहे याची खातरजमा करावी.

क) अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केलेला बचत खाते क्रमांक अर्जदाराने दिलेल्या छायांकीत प्रतीशी पडताळून पहावा.

ड) अर्जामध्ये पॅन कार्ड व पेन्शनच्या तपशीलासंबंधीची माहिती भरली असल्याबाबतची पडताळणी अर्जासोबत दिलेल्या छायांकीत प्रतींवरुन करावी.

(४) अर्जामध्ये नमूद बंधनकारक असलेली माहिती भरली नसल्यास किंवा अशी बंधनकारक असलेली माहिती अर्जदाराने दिलेल्या संबंधित छायांकीत प्रतींशी जुळत नसल्यास अर्ज फेरसादर करण्याबाबत अर्जदारास सूचित करावे.

(५) अर्जदाराचा परिपूर्ण भरलेला अर्ज आपले सरकार सेवा केंद्रावर प्राप्त झाल्यावर केंद्राच्या ऑपरेटरकडून/निर्देशित प्राधिकरणाकडून टोकन क्रमांक देण्यात येईल.

(६) अर्ज परिपूर्ण असल्यास अर्जाचे संगणकीकरण व अर्जदार, पती/पत्नी व कुटूंबातील कर्ज घेतलेल्या इतर व्यक्ती यांचे आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण करण्यासाठी केंद्राचे ऑपरेटर कडून अर्जदारास टोकन नंबर दिला जाईल. असा टोकन नंबर घेऊन

अर्जदाराने केंद्राकडून कळविलेल्या दिवशी वेळेत उपस्थित रहावयाचे आहे. अर्जदारास सुनिश्चित वेळ कळविण्यासाठी खालील बाबींचा अवलंब करावा.

अ) केंद्रावर अर्जदारांची गर्दी होऊ नये तसेच अर्जदाराचा प्रतिक्षाधीन कालावधी कमी व्हावा यासाठी केंद्राच्या ऑपरेटर यांनी एका दिवसासाठी शक्यतो ३० ते ४० टोकन वितरीत करावेत.

ब) अर्जदाराच्या अर्जाचे संगणकीकरण व अर्जदार, पती/ पत्नी व कुटूंबातील कर्ज घेतलेली १८ वर्षाखालील अपत्ये यांचे आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण, केंद्राचे ऑपरेटर यांनी शक्यतो अर्जदाराने टोकन सादर केलेल्या दिवशीच पुर्ण करावे.

---------------------